राष्ट्रीय कृषि विकास योजनेअंतर्गत शेतकऱ्यांच्या दारात गाई-म्हशींमध्ये बायफ, पुणे या सेवाभावी संस्थेमार्फत कृत्रिम रेतनाच्या सुविधा उपलब्ध करून देणे या प्रकल्पास प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग
शासन निर्णय क्रमांक- राकृवि -२०१८/प्र.क्र.६/पदुम-४
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
दिनांक :- २० मार्च, २०१८.

वाचा : १) कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभागाचा शासन निर्णय क्र. संकिर्ण-२०१४/प्र.क्र.-३०४/पदुम-४,मंत्रालय,मुंबई-३२, दि. २७/०४/२०१५.

२) या विभागाचे पत्र क्र.- संकिर्ण-२०१४/प्र.क्र. ३०४/पदुम-४ मंत्रालय विस्तार,मुंबई-३२ दि. २३/०३/२०१७.

३) आयुक्त पशुसंवर्धन, पुणे यांचे कार्यालयीन पत्र क्र.एफवायपी-१२(१७)/सीआर-८१/ पसं-६/२०१७, दि. ३०.१२.२०१७.

४) पत्र क्र.एफवायपी-१२(१७)/सीआर-१७९/२०१७/आरकेव्हीवाय/पसं-६, दि. १९.०१.२०१८

प्रस्तावना :

राष्ट्रीय कृषि विकास योजनेंतर्गत पशुवैद्यक पदवीधर / पशुवैद्यक पदविकाधारक व इतर सुशिक्षित बेरोजगार तसेच स्वयंसेवी / सेवाभावी संस्थांमार्फत शेतक-यांच्या दारात गाई-म्हशींमध्ये कृत्रिम रेतनाच्या सुविधा उपलब्ध करुन देण्याच्या प्रकल्पास दि.१८.०६.२०१५ रोजी पार पडलेल्या २० व्या राज्यस्तरीय प्रकल्प मंजूरी समितीच्या सभेत मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. या अनुषंगाने मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र पशुधन विकास मंडळ, अकोला यांचे स्तरावरून बोलाविण्यात आलेल्या ई-निविदा प्रक्रियेअंती मे.जे.के.ट्रस्ट, ठाणे या सेवाभावी संस्थेमार्फत राज्यातील २६ जिल्ह्यांमध्ये कृत्रिम रेतन केंद्रांची स्थापना करून शेतक-यांच्या दारात गाई-म्हशींमध्ये कृत्रिम रेतनाच्या सुविधा उपलब्ध करून देण्याच्या प्रकल्पास वाचा-१ येथील शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आलेली होती. मे.जे.के.ट्रस्ट, ठाणे यांचे समवेत या अनुषंगाने करण्यात आलेल्या सामंजस्य कराराचा कालावधी दि.३०.०६.२०१७ रोजी संपुष्टात आलेला आहे.

सदरचा प्रकल्प या पुढील कालावधीत देखील राज्यात चालू ठेवण्याच्या अनुषंगाने मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र पशुधन विकास मंडळ, अकोला यांचे स्तरावरून स्वयंसेवी / सेवाभावी संस्थांकडून ई-निविदेव्दारे इच्छापत्रे मागविण्यात आली होती. निविदा समितीने बायफ, पुणे या सेवाभावी संस्थेने राज्यातील ११ जिल्ह्यांसाठी सादर केलेल्या न्युनतम दरास शासनाची मान्यता अपेक्षिलेली आहे.

त्या अनुषंगाने, राज्यातील अमरावती, अकोला, बुलढाणा, यवतमाळ, परभणी, हिंगोली, उस्मानाबाद, लातूर, वर्धा, सोलापूर व कोल्हापूर या ११ जिल्हयांमध्ये “शेतक-यांच्या दारात गाई-म्हशींमध्ये बायफ, पुणे या सेवाभावी संस्थेमार्फत कृत्रिम रेतनाच्या सुविधा उपलब्ध करुन देणे ” हा प्रकल्प राबविण्याच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे शासन निर्णय निगर्मित करण्यात येत आहे.

शासन निर्णय :

राष्ट्रीय कृषि विकास योजनेअंतर्गत शेतक-यांच्या दारात बायफ, पुणे या सेवाभावी संस्थेमार्फत राज्यातील अमरावती, अकोला, बुलढाणा, यवतमाळ, परभणी, हिंगोली, उस्मानाबाद, लातूर, वर्धा, सोलापूर व कोल्हापूर या ११ जिल्हयांमध्ये कृत्रिम रेतन केंद्रांची स्थापना करून गाई-म्हशींमध्ये कृत्रिम रेतनाच्या सुविधा उपलब्ध करुन देणे या प्रकल्पास याद्वारे शासनाची प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्यात येत आहे. तसेच, बायफ, उरळीकांचन, पुणे यांनी जिल्हानिहाय गाई-म्हशीमध्ये कृत्रिम रेतनापासून प्रति वासरू निर्मितीसाठी सादर केलेल्या खालील नमूद दरांना देखील याव्दारे शासनाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे. सदर प्रकल्पाचा कालावधी दि. ३१ मार्च, २०२० रोजी संपूष्टात येईल.

अ.क्र.	**जिल्ह्याचे नांव**	**कृत्रिम रेतनानंतर प्रति वासरू निर्मितीसाठी बायफ,उरळीकांचन, पुणे यांचे मंजुर दर**
पुणे विभाग		
१	सोलापूर	रू. ८४८/-
२	कोल्हापूर	रू. ८१८/-
नागपूर विभाग		
३	वर्धा	रू. १,२९८/-
अमरावती विभाग		
४	अमरावती	रू. १,२९८/-
५	अकोला	रू. १,२९८/-
६	बुलढाणा	रू. १,०३४/-
७	यवतमाळ	रू. १,४९८/-
लातूर विभाग		
८	परभणी	रू. १,४९८/-
९	हिंगोली	रू. १,४९८/-
१०	उस्मानाबाद	रू. ९४८/-
११	लातूर	रू. ९४८/-

१. या प्रकल्पाचे सनियंत्रण अधिकारी आयुक्त पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, पुणे हे राहतील तर योजनेचे अंमलबजावणी अधिकारी मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र पशुधन विकास मंडळ, अकोला हे असतील.

२. बायफ, पुणे या सेवाभावी संस्थेनी उपरोक्त एकुण ११ जिल्हयांमध्ये कृत्रिम रेतनापोटी सेवाशुल्क आकारणी शासन निर्णय क्र. एलव्हीएस -२०१५/प्र.क्र.९३/पदुम-४, मंत्रालय, मुंबई-३२ दि.१४.०९.२०१५ अन्वये करावी. शेतकऱ्यांकडून जमा केलेल्या (रू. ४० + १ = ४१/-) सेवाशुल्कापैकी रू. ४०/- चा भरणा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र पशुधन विकास मंडळ, अकोला यांचेकडे व रू. १/- चा भरणा आयुक्त पशुसंवर्धन, पुणे यांच्या सुचनेप्रमाणे पशुसंवर्धन विभागामार्फत शासन कोषागारात करण्यात यावा.

३. बायफ, पुणे या सेवाभावी संस्थेस शासन निर्णय क्रमांक- एलव्हिएस-२०१०/प्र.क्र.१९८/पदुम-४, दि. १४ मे २०१० अन्वये विहित केलेल्या शासनाच्या पैदाशीच्या धोरणानुसार कृत्रिम रेतन कार्य करणे बंधनकारक राहील.

४. कृत्रिम रेतनासाठी आवश्यक असलेल्या इतर सर्व निविष्ठांची खरेदी केंद्र शासनाच्या स्टँडर्ड ऑपरेटींग प्रोसिजर (SOP) अंतर्गत विहित केलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार करण्यात यावी.

५. बायफ, पुणे या सेवाभावी संस्थेमार्फत केलेल्या गाई-म्हशीमधील कृत्रिम रेतनापासून जन्मलेल्या संकरित वासरांची / म्हशीच्या पारडयांची १०० टक्के पडताळणी नजीकच्या पशुवैद्यकीय संस्थेवरील अधिकारी / कर्मचारी यांनी करावी व त्यांनी तसे प्रमाणित केल्या नंतरच प्रती वासरू निर्मितीसाठीची देय रक्कम बायफ, पुणे या सेवाभावी संस्थेस अदा करण्यात यावी.

६. संबंधित जिल्ह्याचे जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त यांनी विहित नमुन्यातील प्रती वासरू निर्मितीसाठी देय रकमेचे मागणी प्रस्ताव जन्मलेल्या वासरांच्या १०० टक्के पडताळणी अहवालासह महाराष्ट्र पशुधन विकास मंडळ, अकोला या संस्थेस सादर करावा.

७. बायफ, पुणे या सेवाभावी संस्थेने स्थापन केलेल्या कृत्रिम रेतन केंद्रावरील सेवादात्यांने जन्मलेल्या वासराचा अहवाल नजीकच्या पशुवैद्यकीय संस्थेस सादर केल्यापासून बायफ, पुणे या संस्थेस वासरू जन्मल्यानंतर देय रक्कम अदायगी करण्यास ३ महिन्यांपेक्षा जास्त कालावधी लागणार नाही असे पहावे.

८. बायफ, पुणे यांचेकडून करण्यात आलेल्या कृत्रिम रेतनाची नोंद नजिकच्या पशुवैद्यकीय संस्थेकडे ८ दिवसांच्या आत करावी. अशा कृत्रिम रेतनानंतर जन्मलेल्या वासरांसाठी देय रक्कम मिळण्यासाठीचा दावा सोबतच्या **परिशिष्ट "अ"** या विहीत नमुन्यात करावा व तो नजिकच्या पशुसंवर्धन विभागाच्या संस्थेतील अधिकाऱ्यांनी पडताळणी करावा. सदर दाव्यावर जन्मलेल्या वासराचे त्याच्या मालकासोबत छायाचित्र असणे बंधनकारक आहे. बायफ, पुणे यांनी वासरू जन्मल्यानंतर, जन्मलेल्या वासरांची सविस्तर माहिती संबंधित संस्थेस ८ दिवसाच्या आत देण्यात यावी. केलेल्या कृत्रिम रेतनाचा व त्यापासून जन्मलेल्या वासरासाठी दयावयाची रक्कम मागणी केल्यानंतर १५ दिवसांच्या आंत त्यांनी केलेल्या कामाची पडताळणी नजिकच्या पशुवैद्यकीय संस्थानी / विस्तार अधिकाऱ्यांनी करून, त्यांना देय असलेली रक्कम देण्यासाठी जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त यांचेकडे अहवाल सादर करण्यात यावा.

९. बायफ, पुणे यांनी स्थापन केलेल्या कृत्रिम रेतन केंद्रावर झालेल्या कृत्रिम रेतनाचा व कृत्रिम रेतनापासून जन्मलेल्या वासरांचा केंद्रनिहाय डाटा ऑनलाईन ईनाफ मध्ये भरणे बंधनकारक राहील.

१०. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र पशुधन विकास मंडळ, अकोला यांनी बायफ, पुणे या संस्थेमार्फत जिल्हानिहाय कृत्रिम रेतनाचा व त्यापासुन जन्मलेल्या वासरांचा मासिक प्रगती अहवाल आयुक्त पशुसंवर्धन यांना सादर करावा,

११. बायफ, पुणे या सेवाभावी संस्थेमार्फत गाई-म्हशींमध्ये करण्यात आलेल्या कृत्रिम रेतन कार्याचा व कृत्रिम रेतनापासून जन्मलेल्या वासरांचा मासिक प्रगती अहवाल आयुक्त पशुसंवर्धन यांनी दरमहा शासनास १० तारखेपर्यंत निश्चितपणे सादर करण्यात यावा.

१२. या प्रकल्पांतर्गत बायफ, पुणे या संस्थेचे एकुणच कामकाज समाधानकारक नसल्याचे आढळून आल्यास, आयुक्त पशुसंवर्धन हे त्यांची या प्रकल्पांतर्गत केलेली निवड शासन मान्यतेने तात्काळ संपुष्टात आणतील.

१३. जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी व पशुधन विकास अधिकारी, जिल्हा कृत्रिम रेतन केंद्र यांच्या समितीने जिल्हयातील कार्यरत पशुवैद्यकीय संस्थांसाठी १००० पैदासक्षम गाई- म्हशींच्या संख्येच्या मर्यादेत गावांचे कृत्रिम रेतन कार्यासाठी कार्यक्षेत्र निश्चित करावे. इतर गावात कृत्रिम रेतनाच्या सुविधा उपलब्ध करण्यासाठी प्रजननक्षम गाई / म्हशींच्या संख्येनुसार बायफ या सेवाभावी संस्थांच्या आणि सेवादातांच्या कृत्रिम रेतन केंद्राच्या मुख्यालयाचे ठिकाण व त्याचे कार्यक्षेत्र निश्चित करावे व त्यास आयुक्त पशुसंवर्धन यांची मान्यता घेवूनच सदर केंद्रे कार्यान्वित करण्यात यावीत.

१४. बायफ, पुणे या सेवाभावी संस्थेनी केलेल्या कृत्रिम रेतन कार्याची तसेच, कृत्रिम रेतनानंतर जन्मलेल्या वासरांची जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी / जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त / प्रादेशिक पशुसंवर्धन सहआयुक्त यांनी त्यांच्या दौऱ्याच्या वेळी रॅन्डम पध्दतीने १० टक्के पडताळणी करावी. सदर पडताळणीचा अहवाल प्रादेशिक पशुसंवर्धन सहआयुक्त यांनी दरमहा आयुक्त पशुसंवर्धन, पुणे यांच्याकडे सादर करावा.

१५. कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभागाचा शासन निर्णय दि. २० जून, २००९ अन्वये गठित केलल्या राज्य संनियंत्रण समिती व जिल्हास्तरीय संनियंत्रण समितीव्दारे सदर योजनेचे सनियंत्रण करण्यात यावे.

१६. या प्रकल्पाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी व प्रकल्पाचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी आवश्यक त्या सविस्तर मार्गदर्शक सुचना आयुक्त पशुसंवर्धन, पुणे यांनी सर्व संबंधित क्षेत्रिय अधिकाऱ्यांना तात्काळ निर्गमित कराव्यात.

१७. हा प्रकल्प प्रभावीपणे राबविण्यासाठी कार्यक्षेत्रामधील बेरड वळुंचे खच्चीकरण करण्यासाठी जवळच्या पशुवैद्यकीय संस्थेमार्फत विशेष कार्य मोहिमांचे आयोजन करण्यात यावे.

१८. कृत्रिम रेतन कार्याच्या नोंदीसाठी शेतकऱ्यांना / पशुपालकांना ए. आय. कार्ड देण्यात यावेत.

१९. सदर प्रकल्प राबविताना आयुक्त पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, पुणे व मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र पशुधन विकास मंडळ, अकोला यांनी प्रकल्पाची अंमलबजावणी / सनियंत्रण आणि मुल्यमापन करणे याबाबत आवश्यक तो समन्वय आयुक्त (कृषि), महाराष्ट्र राज्य, पुणे व महाराष्ट्र राज्य छोटया शेतकऱ्यांचा कृषि व्यापार संघ, पुणे यांच्याशी ठेवावा.

२०. या प्रकल्पासाठी उपलब्ध करून देण्यात आलेला निधी उपयोगात आणताना राज्यस्तरीय प्रकल्प मंजूरी समितीच्या बैठकीतील निर्णय व या योजनेसंदर्भात केंद्रशासनाने निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचना विचारात घेवून खर्च करण्यात यावा. या प्रकल्पांतर्गत उपलब्ध करून देण्यात आलेल्या निधीच्या विनियोगा बाबतचे विहीत नमुन्यातील उपयोगिता प्रमाणपत्र आयुक्त पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी शासनास सादर करावे.

२१. तसेच, या प्रकल्पाचे मुल्यामापन आयुक्त पशुसंवर्धन किंवा आयुक्त (कृषि), महाराष्ट्र राज्य यांचेमार्फत बाह्यसेवी संस्थाकडून करण्यात यावे व मुल्यमापन अहवाल आयुक्त पशुसंवर्धन यांनी त्यांच्या अभिप्रायासह शासनास सादर करण्यात यावा.

मुल्यमापन समिती

१.	अतिरिक्त आयुक्त पशुसंवर्धन, आयुक्त पशुसंवर्धन कार्यालय, पुणे	अध्यक्ष
२.	मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र पशुधन विकास मंडळ, अकोला	सदस्य
३.	प्रादेशिक पशुसंवर्धन सहआयुक्त नागपूर विभाग, औरंगाबाद	सदस्य
५.	जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त सोलापूर	सदस्य
६.	जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद, बुलढाणा	सदस्य
७.	पशुसंवर्धन उपायुक्त (नियोजन व अंदाज)	सदस्य सचिव

तसेच, या प्रकल्पाचे मुल्यमापन नॅबकॉन, ॲग्रीकल्चर फायनान्स कॉर्पोरेशन इ.बाह्यसेवी संस्थेमार्फत सुध्दा करण्यात यावे व या संस्थेने केलेला मुल्यमापन अहवाल आयुक्त पशुसंवर्धन यांनी त्यांच्या अभिप्रायासह शासनास सादर करावा.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेताक २०१८०३२११११२४२७३७०१ असा आहे. सदर शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून निर्गमित करण्यात येत आहे,

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Shri Ravindra Gurav

Digitally signed by Shri Ravindra Gurav
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Agriculture And Adf Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=0030b22364370f4d96ab251b7263219586c0069b661c3f9cd6fd67e55000ce92, cn=Shri Ravindra Gurav
Date: 2018.03.21 15:11:02 +05'30'

(रविंद्र गुरव)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत-

१) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
२) मा. मंत्री (पदुम) यांचे खाजगी सचिव
३) मा. राज्यमंत्री (पदुम) यांचे खाजगी सचिव
४) प्रधान सचिव (कृषि), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
५) आयुक्त पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, औंध, पुणे

६) आयुक्त कृषि, महाराष्ट्र राज्य, पुणे
७) आयुक्त दुग्धव्यवसाय विकास, महाराष्ट्र राज्य, वरळी, मुंबई
८) उपसचिव (राकृवियो) कृषि व पदुम विभाग, मंत्रालय,मुंबई
९) जिल्हाधिकारी, सर्व
१०) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सर्व
११) अतिरिक्त आयुक्त पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, औंध, पुणे
१२) मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र पशुधन विकास मंडळ, अकोला
१३) उप सचिव (दुग्धव्यवसाय) कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई
१४) जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त, सर्व
१५) विभागीय व्यवस्थापक, गोठीत रेत प्रयोगशाळा, पुणे / नागपूर / औरंगाबाद (हर्सुल)
१६) जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद, सर्व
१७) बाएफ डेव्हलपमेंट रिसर्च फाऊंडेशन, सेंट्रल रिसर्च स्टेशन, ऊरूळीकांचन, जि. पुणे-४१२२०२.
१८) पशुधन विकास अधिकारी, जिल्हा कृत्रिम रेतन केंद्र सर्व
१९) निवड नस्ती.

परिशिष्ट – अ

Rashtriya Krishi Vikas Yojana – Strengthening of A.I. Delivery System

Proforma for Calf Born Certificate

I, the undersigned --------- (Name of the A.I.Worker) i/c of the Center ---- (Name of the village) Taluka ------Dist ------ do hereby certify that, I have personally verified the birth of the crossbred / upgraded male / female buffalo calf, which has been born out of the Artificial Insemination carried out by me. The details are as mentioned below.

a) Name of the owner of the cow/ buffalo ------

b) Address of the owner ----------------

c) Details of Artificial Insemination performed on the cow / buffalo under reference

(Details of semen used of the sire i.e.

bull no. blood level etc.)

I st A.I. (date)

II nd A.I. (date)

III rd A.I. (date)

a. Date of birth of the crossbred /upgraded buffalo calf --------

b. Sex of the crossbred / upgraded buffalo calf (male/female)

c. Tag No. of the ear tag affixed -----------

d. Photograph of the calf along with the owner (attached)

Date ----------

Place --------

Sd/-

(Name of the A.I.Worker)

Verification

I the undersigned,-----------(Name & designation of technical officer / servant of A.H. Dept.) certify that, I have personally visited the house / farm of the owner on date -----whose details are mentioned above, I have also verified the crossbred / upgraded buffalo calf, whose description is shown as above. To the best of my knowledge and experience, the said crossbred / upgraded buffalo calf is found to be born from A. I. performed by ----------- (Name of A.I. worker) ------ A.I. center, Taluka ------

Dist -----

Date ------ Sd/-

Place ----- (Name & designation of technical officer/In charge of Veterinary Institute) (official stamp/seal)